स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत मराठी विषयात विद्यावाचस्पती पदवीच्या
अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

मराठी साहित्यातून आविष्कृत झालेल्या पर्यावरण विषयक विचारांचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : अतुल देऊळगावकर यांचे साहित्य)

संशोधक

ठाकूर सागर राजाराम

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आलगुले केशव विठ्ठल

मराठी विभाग

जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

संशोधक केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

डिसेंबर - 2024

मराठी साहित्यातून आविष्कृत झालेल्या पर्यावरण विषयक विचारांचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : अतुल देऊळगावकर यांचे साहित्य)

प्रस्तावना :

मराठी साहित्यात ललित साहित्य व ललितेतर साहित्य असे दोन प्रकार पडतात. ललित साहित्य हे वाचकांच्या भावनांना आवाहन करते तर ललितेतर साहित्य हे वाचकांच्या विचारांना आवाहन करत असते. मराठीमध्ये दोन्हीही प्रकारच्या साहित्यांना वेगवेगळे स्थान आहे. एक सत्याला तर एक सत्याभासाला महत्त्व देते. पर्यावरण हा विषय मराठी साहित्यात दुर्मिळच. तर पर्यावरणावरती लिहिणारे जे काही मोजकेच साहित्यिक आहेत, त्या साहित्यिकांचा आणि त्यांच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी लिहिल्या गेलेल्या साहित्याचा अभ्यास फारसा झालेला नाही. संशोधन ही तर खूपच दूरची गोष्ट आहे. मुळात साहित्य या शब्दाचा अर्थ 'हित करते ते साहित्य' असा होतो. मराठी साहित्यात साहित्याची संज्ञा व्यापक असली तरी त्यातून तोच अर्थ प्राप्त होतो. अर्वाचीन काळात अनेक साहित्यिकांनी निसर्गावर लिहिणं पसंद केलं. त्याच निसर्गाच्या संवर्धनावर क्वचितच लिहिलं गेलं. निसर्गाचा भाग म्हणजे पर्यावरण. पर्यावरण ही तशी खूप विस्तीर्ण गोष्ट. पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील कोणत्याही प्रदेशातील सजीव, निर्जीव, इत्यादी घटक मिळून जी परिस्थिती तयार होते, मग त्यात पृथ्वीवर पडणारा सूर्यप्रकाश, माणूस, पशुपक्षी, झाडे, आपल्या आजूबाजूचे दगड-माती, हवा, पाणी, इत्यादी सर्वच समाविष्ट असतात. नैसर्गिक पर्यावरणाचे जैविक व अजैविक असे प्रकार पडत असले तरी उपरोक्त गोष्टींचे त्यात वर्गीकरण केले जाते. त्याचबरोबर मानवनिर्मित घटकांच्या परिस्थितीमध्ये सुद्धा मानवाने विविध अर्थाने पर्यावरण वापरली आहे.

पर्यावरण या विषयावर लिहिणारे मराठी साहित्यिक हे बोटावर मोजण्याइतकेच आहेत. माडगूळकर, मारुती चितमपल्ली, दुर्गा भागवत यांनी ललित अंगाने पर्यावरणावर

आधारित साहित्य लिहिले. त्यानंतर काही अपवाद वगळता ललित साहित्यामध्ये पर्यावरण ही गोष्टच मुळी दुर्मिळ होऊन बसली. तत्पूर्वी मध्ययुगीन महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांनी आपल्या साहित्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. संत तुकाराम तर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या अभंगातून निसर्गाशी माणूस या प्राण्याचे असलेले नाते विशद करतात. तर ललितेतर साहित्यात माधव गाडगीळ, अशोक गाडगीळ, राघवेंद्र गडकर, पांडुरंग सुखात्मे, नलिनी निमकर, मुजुमदार तसेच अतुल देऊळगावकर इत्यादींनी वैचारिक अंगाने पर्यावरणवादी साहित्य लिहिले. त्यांपैकीच सातत्याने लिहिणाऱ्या साहित्यिकांमध्ये श्री अतुल देऊळगावकर यांचे नाव अग्रक्रमाने येते.

माणूस काळानुरूप उत्क्रांतीनुसार बदलत गेला. त्याची विचार करण्याची क्षमता, नवीन सर्जन करण्याची क्षमता आणि कुतूहल वाढू लागले. त्यातूनच त्याने अनेक मानवी कल्याणाचे व सृष्टीच्या हिताचे असे शोध लावले. परंतु काळानुरूप त्याची भूक वाढू लागली आपणच सर्व काही आहोत, आपल्या बुद्धीच्या जोरावर आपण या पृथ्वी आणि निसर्गावर नियंत्रण मिळवू शकतो, असे त्याला वाटू लागले. आणि त्या भुकेतून पत, प्रतिष्ठा, इत्यादींच्या पाठीमागे तो धावू लागला. प्रसंगी त्याने निसर्गाची अतोनात हानी केली. मूलभूत गरजांच्या नावाखाली जंगलंच्या जंगलं सपाट केली. व तिथे काँक्रीटची जंगलं उभारली. पैशासाठी वाटेल त्या थराला जात प्राण्यांची कत्तल, नद्यांचे प्रदूषण इ. तो जाणीवपूर्वक घडवून आणू लागला. ज्याचा परिणाम म्हणून हवामान बदल, ओझोन थर पातळ होणे, ढगफुटी, कोरडा दुष्काळ, इत्यादी नैसर्गिक आपत्ती येऊ लागल्या.

'वसुधैव कुटुम्बकम्' हा विचार घेऊन पुढे आलेली आपली प्राचीन वैदिक संस्कृती. आणि त्या संस्कृतीचा भाग असलेले आपण व आपले पूर्वज ज्यांनी वृक्षतोड थांबावी म्हणून आपल्या शंभर पुत्रांसह लढा दिला. हत्तींचा अभ्यास करण्यासाठी हत्तींच्याच कळपामध्ये जाऊन राहणारे आपलेच लोक. अशा अनेक गोष्टी आपल्याला आपल्या पुराणातून ऐतिहासिक दस्तऐवजातून वाचायला, पाहायला, ऐकायला मिळतात.

संशोधन निवडीची भूमिका :

प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषयाच्या अनुषंगाने ‘अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण संवर्धनाचा विचार : एक अभ्यास’ हा विषय घेऊन संशोधन करण्यात येणार आहे. पर्यावरणाची अतोनात होणारी हानी, तापमानातील अनाकलनीय असे बदल आणि महापूर, भूस्खलन, भूकंप, थंडीची लाट, उष्माघात इत्यादी नैसर्गिक वाटणाऱ्या, परंतु माणसाच्या कर्तृत्वामुळे आपल्यावर ओढवल्या जाणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून, ते आपले कर्तव्य आहे. हे येथे प्रकर्षाने जाणवते आहे. व अशा या पर्यावरण संवर्धन विषयक विचार घेऊन साहित्यिक अंगाने जर आपण संशोधन व अभ्यास केला तर नक्कीच पुढील पिढीला पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटेल. व त्या दृष्टीने ते कर्तव्य तत्पर होऊन पाऊले उचलतील. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत वेगळया अशा वैचारिक विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या विशेष साहित्यकृती :

१. देऊळगावकर अतुल : ‘डळमळले भूमंडळ’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
२. देऊळगावकर अतुल : ‘लॉरी बेकर’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
३. देऊळगावकर अतुल : ‘स्वामीनाथन : भूकमुक्तीचा ध्यास’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
४. देऊळगावकर अतुल : बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरण वाद्याची’, मौज प्रकाशन
५. देऊळगावकर अतुल : विश्वाचे आर्त’, लोकवाङ्मयगृह, मुंबई
६. देऊळगावकर अतुल : पृथ्वीचे आख्यान
७. देऊळगावकर अतुल : निसर्गकल्लोळ

८. देऊळगावकर अतुल : ग्रेटाची हाक ऐकू येतेय ना?’, मनोविकास प्रकाशन, पुणे
९. देऊळगावकर अतुल : आपत्तीचक्र, रोहन प्रकाशन, पुणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करत असताना संशोधन पद्धती महत्त्वाचे कार्य करते. प्रस्तुत संशोधनाच्या पद्धतीमध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती अस्तित्वात आहेत. त्यापैकी प्रस्तुत संशोधनासाठी समीक्षात्मक संशोधन व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात येणार आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करून संशोधनाला दिशा देण्याचा प्रयत्न असेल.

संशोधनाची उद्दिष्टे :

- मराठी साहित्य आणि पर्यावरण यांचा विकास व वाटचालीच्या दृष्टीने अभ्यास करणे.
- अतुल देऊळगावकर यांच्या व्यक्तिवेध व साहित्यिक जडणघडणीचा अभ्यास करणे.
- अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण विषयक विचार व सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
- अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण संवर्धन विषयक विचारांचा अभ्यास करणे .
- अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यकृतींचे वांग्मयीन मूल्य व भाषाशैलीचा अभ्यास करणे
- पर्यावरणाचा साहित्यिक अंगाने अभ्यास करणे.
- पर्यावरण ही संकल्पना पुढील संशोधकांपर्यंत पोहोचवणे.

- पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करणे.
- पर्यावरण साहित्यातून लोक जागृती करणे.

संशोधनाची गृहीतके :

- अतुल देऊळगावकर हे जागतिक कीर्तीचे पर्यावरण तज्ञ आहेत
- अतुल देऊळगावकर हे ख्यातनाम वैचारिक लेखक आहेत
- अतुल देऊळगावकर हे जागतिक कीर्तीचे विचारवंत आहेत
- पर्यावरणाच्या हानीस आपणच कारणीभूत आहोत
- पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे
- पर्यावरण संवर्धन ही आपली जबाबदारी आहे.
- नियोजन केल्यास आपत्ती व्यवस्थापन करणे सुकर होते.

पुढील प्रमाणे प्रकरण निहाय विभागणी करत संशोधन पूर्ण केले जाईल.

प्रकरण एक : मराठी साहित्य आणि पर्यावरण : विकास व वाटचाल.

प्रस्तुत प्रकरणात आपण पर्यावरण म्हणजे काय? पर्यावरणाची व्याख्या, स्वरूप, इ. पाहणार आहोत. तसेच पर्यावरण आणि पर्यावरण विषयक साहित्य यांवर चर्चा करणार आहोत. तसेच भाषा, साहित्य आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध, तसेच पर्यावरणावर

लिहिले गेलेले मराठी भाषेतील साहित्य आणि साहित्यिक व पर्यावरणवादी वैचारिक साहित्य यांचा विचार आपण करणार आहोत.

प्रकरण दोन : अतुल देऊळगावकर यांचा व्यक्तित्ववेध व साहित्यिक जडणघडण.

प्रस्तुत प्रकरणातून आपण निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने निवडलेल्या लेखकाचा अर्थात अतुल चंद्रकांत देऊळगावकर यांचा परिचय जाणून घेणार आहोत. अतुल देऊळगावकर हे जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ असून चौफेर अभ्यास करून अभ्यासपूर्ण मांडणी करत ते लिहीत असतात. लातूर येथे वास्तव्यास असलेल्या देऊळगावकर यांना घरातूनच सारस्वतांचा संग लाभला. देऊळगावकर यांनी आत्तापर्यंत 16 पुस्तके लिहिली असून त्यापैकी तेरा पुस्तकांचे मराठीत लिखाण केले आहे तर त्यांच्या काही पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी, तमिळ इत्यादी भाषांमध्ये अनुवाद सुद्धा झालेले आहेत. उपरोक्त पुस्तकांपैकी नऊ पुस्तके पर्यावरण व हवामान या गोष्टी डोळयासमोर ठेवून त्यांनी अभ्यासपूर्ण लिखाण केले आहे. देऊळगावकर यांना राज्य शासन, केंद्र शासन तसेच विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संस्थांतर्फे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत. तसेच मार्च 2018 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळामध्ये विधिमंडळ सदस्यांसमोर हवामानातील बदल : आव्हाने आणि उपाययोजना या विषयावर सविस्तर असे भाषण व मार्गदर्शन त्यांनी केले आहे लेखक जागतिक कीर्तीचे पर्यावरण तज्ञ असल्याने पर्यावरण व हवामान विषयक परिषदांमध्ये अमेरिका, इंडोनेशिया, फ्रान्स, बांगलादेश, सेनेगल, नेपाळ, पाकिस्तान इत्यादी देशांमध्ये जाऊन त्यांनी आपलं म्हणणं मांडलं आहे. प्रस्तुत घटकातून आपण अतुल देऊळगावकर यांचा सविस्तर असा परिचय नोंदविणार आहोत. ज्यामध्ये त्यांची प्रकाशित पुस्तके, पुस्तकांतील थोडक्यात आशय, तसेच त्यांच्या पुस्तकांचे झालेले अनुवाद, त्यांना मिळालेले विविध पुरस्कार आणि त्यांचा पर्यावरणातील सहभाग ह्या सर्व नोंदी आपण घेणार आहोत.

प्रकरण तीन : अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण व सद्यस्थिती.

प्रस्तुत प्रकरणातून आपण निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने अतुल देऊळगावकर यांच्या सर्व साहित्यकृती यांचा धावता आढावा घेत, लेखकाच्या पर्यावरणवादी साहित्यावर भर देत त्या सर्व पर्यावरणवादी साहित्यकृतींचा अभ्यास करणार आहोत. प्रस्तुत प्रकरणात आपण लेखकाचे पर्यावरण हा विषय केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेलेले साहित्य अभ्यासणार आहोत. लेखकाच्या लिहिण्यामागील प्रेरणा, विषय निवडी मागील कारणे, इत्यादी सर्व गोष्टींचा अभ्यास आपण या प्रकरणातून करत असताना पर्यावरण, देऊळगावकरांच्या साहित्यातून येणारे पर्यावरण आणि पर्यावरणाची सद्यस्थिती यांचा अभ्यास आपण करणार आहोत.

प्रकरण चार : अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण संवर्धन विषयक विचार.

प्रस्तुत प्रकरणातून आपण निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने अतुल देऊळगावकर यांच्या साहित्यातील पर्यावरण संवर्धन विषयक विचार जाणून घेणार आहोत. तसेच लेखकाच्या पर्यावरण विषयक वैचारिक साहित्य लिहिण्यामागच्या भूमिकेचा उलगडा आपण करणार आहोत.

प्रकरण पाच : अतुल देऊळगावकर यांच्या निवडलेल्या साहित्यकृतींचे वाङ्मयीन मूल्य व भाषाशैली.

प्रस्तुत प्रकरणातून निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने अतुल देऊळगावकर यांनी एकंदरीत साहित्य आणि साहित्यासाठी वापरली गेलेली त्यांची भाषाशैली यांचा ऊहापोह

इथे आपण करणार आहोत. तसेच या प्रकरणात निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने निवडलेल्या वैचारिक साहित्यकृतींचा अभ्यास करून त्यांतून आलेल्या वांग्मयीन मूल्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाईल.

उपसंहार आणि निष्कर्ष

सदरील प्रकरणात एकूण शोधनिबंधाचा उपसंहार मांडण्यात येईल. आणि निष्कर्षाची नोंद केली जाईल. व शेवटी संदर्भ ग्रंथांची यादी जोडली जाईल.

संदर्भ :

१. देऊळगावकर अतुल : 'डळमळले भूमंडळ', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
२. देऊळगावकर अतुल : 'लॉरी बेकर', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
३. देऊळगावकर अतुल : 'स्वामीनाथन : भूकमुक्तीचा ध्यास', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.
४. देऊळगावकर अतुल : 'बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरण वाद्याची', मौज प्रकाशन, मुंबई.
५. देऊळगावकर अतुल : 'विश्वाचे आर्त', मनोविकास प्रकाशन, पुणे.
६. देऊळगावकर अतुल : 'पृथ्वीचे आख्यान'
७. देऊळगावकर अतुल : 'निसर्गकल्लोळ'
८. देऊळगावकर अतुल : 'ग्रेटाची हाक ऐकू येतेय ना?', मनोविकास प्रकाशन, पुणे.
९. देऊळगावकर अतुल : 'आपत्तीचक्र', रोहन प्रकाशन, पुणे.
१०. देऊळगावकर अतुल : 'ग्रंथांचीया द्वारी', विश्वकर्मा प्रकाशन, पुणे.
११. देऊळगावकर अतुल : 'विवेकीयांची संगती', मनोविकास प्रकाशन, पुणे.
१२. डॉ. तुषार घोरपडे : 'पर्यावरण परिस्थितीकी', सह्याद्री प्रकाशन, पुणे.

१३. कुमठेकर प्रसाद : ‘बगळा’, पार प्रकाशन, मुंबई.

१४. सा. साधना.

१५. दै. लोकसत्ता.

१६. दै. सकाळ.

१७. दै. महाराष्ट्र टाइम्स.

१८. विकीपेडीया.

संशोधन मार्गदर्शक **संशोधक**

प्रा. डॉ. आलगुले केशव विठ्ठल. **ठाकूर सागर राजाराम.**

मराठी विभाग,

जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.